Review Of Research
Vol. 3 | Issue. 7 | April. 2014
Impact Factor : 2.1002 (UIF)
ISSN:-2249-894X
Available online at www.ror.isrj.net

ORIGINAL ARTICLE

# *तलवार या युद्धशस्त्रास्त्राविषयी अष्टांगिक ऐतिहासिक विचार*

*अनिल माणिकराव बैसाणे*

माजी इतिहास विभाग प्रमुख, झेड् बी. पाटील कॉलेज, देवपूर, धुळे .

***सारांश :-***

तलवार हे प्राचीन व परंपरागत असे अमुक्त म्हणजे हाताने धरून लढण्यासाठी असलेले अस्त्र आहे. शत्रुला भोसकून, जवळून घाव घालून घायाळ करता येते. पायदळ व घोडदळ अशा दोन्ही दळामध्ये तलवारीचा वापर होत असे. तलवारीच्या माऱ्यापासून संरक्षण करण्यासाठी ढाल, चिलखत यांचा उपयोग करण्यात येत होता किंवा शत्रुच्या तलवारीचा वार आपल्या तलवारीवर झेलून आत्मरक्षण करत.

***प्रस्तावना :***

पाते व मूठ अशा दोन भागात असलेल्या तलवारी आकारावरून व विविधतेतून ती धारण करणाऱ्याची मनोभूमिका कळत असे. राजवाडे संशोधन मंडळात संग्रहीत तलवारी ह्या मान्यवरांनी भेट म्हणून दिल्या आहेत. त्यात अंग, रूप, जाती, वर्ण तलवार, कालखंडानुसार तलवारी, त्यांची विविध प्रकार व माहिती सविस्तर दिली आहे.

***तलवारीचे अश्टांग विचार***

***अंग***

तलवारीचे अंग निवितांना तिच्या अंगावर अनेक प्रकारचे चिन्हे उमटून येतात, जसे खोंं, सांधे, रंग, जव्हेर, अभ्रे व माळ इत्यादी चिन्हे हे होय. त्यांना अंगे असे म्हणतात.

***रूप***

रूपवान तलवारीचे पान हे उत्तम दर्जाचे असते. यावर वीर बिरूदे कोरलेली असतात. या तलवारीला पानाच्या प्रमाणत मूठ बसविली जाते. तसेच धार ही देखील उत्तम दर्जाची असते.

***जती***

तलवारीच्या चार जाती किंवा प्रकार असून ती पुढीलप्रमाणे आहेत.

***ब्राह्मण तलवार***

ब्राह्मण तलवार उत्तम दर्जाची असून ही तलवार हिमालय व कुशद्धिप या ठिकाणी बनविली जात होती. या तलवारीने झालेल्या जखमेमुळे मानवाला अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. अंग दुखणे, सुजणे, तहान लागणे, ताप येणे, इत्यादी विपरीत परिणम मानवी शरीरावर होतात. ताप वाढल्यास मानवाचा मृत्युदेखील होत असे.

***क्षत्रिय तलवार***

भुरकट रंगाचे, तीक्ष्ण धारेचे व नाददार आवाजाच्या तलवारीला क्षत्रिय तलवार असे म्हणतात. या तलवारीला सहाण

यंत्रावर ठेवल्यास त्यातून अग्नीकण निघतात. तिच्या आघातामुळे मानवी शरीरावर विपरीत परिणाम घडून येतात.

***वैश्य तलवार***

वैश्य तलवार ही निळ्या रंगाची असते. या तलवारीची धार ही आकाराने रूंद असून तिचा आवाज कर्कश येतो आणि याची तीक्ष्णता कमी असते. याला वैश्य तलवार असे म्हणतात.

***शूद्र तलवार***

शूद्र तलवार ही पिंगट किंवा मेघ वर्णाची असते. या तलवारीची धार कमी असून तिचा आवाज कर्कश येतो आणि याची तीक्ष्णता कमी असते.

***नेत्र***

तलवारीतील चिन्हे म्हणजेच नेत्र होय. खातेवार, गटबंदी, चमनबंदी इत्यादी विविध प्रकारचे नेत्र तत्कालीन तलवारींवर आढळून येतात. ही चिन्हे ओळखण्यासाठी चौकस दृष्टीची आवश्यकता असते. त्याचबरोबर चक्र, गदा, डमरू, धनुष्य, अंकुश, पताका, वीणा, ध्वज, सिंह, सिंहासन, हंस, पुष्पमाला, दशन, मयूर, जिव्हा, चामर, इत्यादी विविध नेत्रे तलवारींवर प्रचलित होते.

***अरिष्ट***

तलवारीवरील अशुभ चिन्हांना अरिष्ट असे म्हणतात. अरिष्ट म्हणजे वाईट प्रसंग आणणरी अशुभ तलवार होय. यात बेडूक, कावळा, गिधाड इत्यादी अशुभ प्राण्यांच्या चिन्हांचा समावेश होतो. अशी चिन्हे असलेल्या तलवारींना अरिष्ट किंवा अशुभ तलवार असे म्हणतात.

***शुभ तलवार***

ज्या तलवारीवर ध्वज, सिंहासन, हंस, हत्ती, घोडे, सिंह, गाय इत्यादी चिन्हे आहेत, त्यांचा रंग शुभ्र, निळा किंवा काळा असून ज्यांचा ध्वनी खणखणीत आहे त्याला शुभ तलवार असे म्हणतात.

***चिन्हे***

ज्याप्रमाणे घोड्याची उत्तम लक्षणे लक्षात घेतली जातात त्याचप्रमाणे तलवारीचे विविध गुण व चिन्हे लक्षात घेणे आवश्यक ठरते.

***भूमि***

तलवारीच्या बनावटीत स्थानपरत्वे विविधता आढळून येते. यात प्रामुख्याने वाराणशी, मगध, नेपाळ, सौराष्ट्र इत्यादी ठिकाणी तयार होणाऱ्या तलवारी उत्तम दर्जाच्या होत्या.

***परिमाण***

तलवारीच्या पानाची लाबी, रूंदी व वजन ही मापणे मानवी संख्येच्या प्रमाणावर अवलंबून असते. मध्ययुगीन कालखंडातील लष्कराचे पायदळ व घोडदळ हे दोन महत्त्वाचे घटक होते. या दोन्ही दलातील सैनिकांची संख्या अधिक असून त्यांच्या शरीराच्या तुलनेत तलवारीच्या परिमाणत विविधता होती.[1]

***प्राचीन कालखंडातील तलवारी***

तलवार हे एक प्राचीन शस्त्र आहे. धनुर्विद्येत शस्त्रास्त्रांची मुक्त, अमुक्त आणि यंत्रयुक्त अशी चार विभागात केलेली आहे. त्यात तलवार ही अमुक्त शस्त्रास्त्रांत गणली जाते. कारण ती हातापासून वेगळी करून चालवता येत नाही. तलवारीला तांबे, कासे याची पाती आणि हाडांच्या व धातुच्या मुठी बसवीत. सिंधु संस्कृतीच्या काळात तलवारी होत्या किंवा नाही या विषयी मतभेद आहेत. भाल्यांची लांब पाने म्हणजे आखूड तलवारीची प्रतिकृती होय. तसेच यजुर्वेद संहितेत लोखंडी शस्त्रास्त्रांचा स्पष्ट निर्देश केल्याचे आढळून येते. धातूचा पत्रा कापून काही तलवारी बनवल्या जात पण काही तलवारी पोलादाचा रस मातीच्या साच्यात ओतून तयार करीत होते, असे आढळून येते.

प्राचीन वैदिक आणि इतर वाङ्मयात तलवारीच्या नावाचा उल्लेख निर्देशित केल्याचे दिसते. यात धनुर्वेद, वीर चिंतामणी बृहत्संहिता, युक्तिकल्पतरू इत्यादी ग्रंथांमध्ये करवाल, असि, निस्त्रिश, चंद्रहास, खंड्ग, मंडलाग्र, असियष्टि इत्यादी तलवारींची नावे आढळतात.[2]

***मध्ययुगीन कालखंडातील तलवारींचे विविध प्रकार व माहिती***

इ.स. वी. सनाच्या आकराव्या शतकाच्या सुरुवातीपासून भारतावर वायव्येकडून तुर्क व अफगाण लोकांची आक्रमणे होऊ लागली. त्यांनी आपल्या प्रदेशाचा विस्तार भारतात करण्यास सुरुवात केली आणि पुढे 13 व्या व 14 व्या शतकापासून इराणी व तुर्की तलवारी येऊ लागल्या. किर्क, नद्रबान, बिंद, बेगमी, कुम व शुभ या इराणी व याटगान, कोपीस या तुर्की तलवारी

प्रचारात होत्या. पानिपतच्या पहिल्या युद्धामुळे सुलतानशाही नष्ट होऊन भारतात मुघल सत्तेची स्थापना झाली. यावेळी मुघलांनी निरनिराळ्या प्रकारची शस्त्रास्त्रे भारतात आणल्याचे दिसून येते. यात प्रामुख्याने अब्बसी, इराणी, मुग्रब, तुर्की अलेमान, अरबी सुरे, जनुबी, सोसन, हुसेनी, किरचा इत्यादी तलवारींचा समावेश होता. त्याचबरोबर तत्कालीन भारतात शिरोही, मानाशाही, पबाशही, कर्नाटकी करवाल, खारीबाव, गुजराथ, चंपानेरी, जोधान, पट्टणी, पालनपुरी, तेगा, रामपुरीकत्ती, सकेल, दांडपट्टा इत्यादी तलवारी होत्या.[3]

### *मुघल कालखंडातील तलवारी*

मुघलांच्या तलवारीचे आकार बहुतेक लांब, सरळ आणि वर्तुळाकार, एकधारी किंवा दुधारी या प्रकारचे होते. बहुतेक त्यांच्याकडील तलवारीचा वरील भाग एकधारी किंवा खालचा भाग दुधारी अशा स्वरूपाचा होता. धूप तलवारी ही चार व पाच फुट लांब, सरळ आणि दुधारी होती. सार्वभौम शक्तीशाली आणि राजीय गौरवशाली म्हणून या तलवारीचे महत्त्व होते. त्यांच्या काळात दारू गोळ्याचा वापर करण्यात येत असून देखील त्यांनी युद्धात तलवारी वापरण्यावर भर दिल्याचे दिसते.

हुमायुनच्या काळात 'कमरजेब' ह्या तलवारीचा उल्लेख हुमायुननामात मिळतो. त्याचबरोबर अकबर कालीन चाळीस तलवारी संग्रहित होत्या. यात सर्व कोतला प्रकारच्या तलवारीचा समावेश होता. त्यांच्याकाळात यकबंदी ही तलवार प्रचलित होती. तसेच पुढील मुघलांच्या काळात प्रामुख्याने दुश्मनकुश, आलमस्तिाब, फतेह–हे–लष्कर, यारेवफादार, इत्यादी तलवारी प्रसिद्ध होत्या.[4]

### *मराठाकालीन तलवारी*

शिवकाळात दांडपट्टा नावाची तलवार सरळ, लांब व दुधारी स्वरूपाची होती. तत्कालीन तलवारींपेक्षा दांडपट्टा या तलवारीचे वजन जास्त होते. या तलवारीच्या मुठीवर लांब अशी नकलगार्ड लावलेली होती. त्यामुळे हाताचे संरक्षण होत असावे. तसेच या काळातील तलवारी बनविण्यासाठी लोखंडाचा उपयोग होत असे. शिवोत्तर काळात स्वराज्याचा विस्तार मराठ्यांनी भारतभर केला. या काळात घोडदळाला जास्त महत्त्व प्राप्त झाले होते. शत्रुला अनपेक्षितच स्थळी गाठून चकित करायचे आणि अदृश्य व्हायचे या युद्धनीतीचा अवलंब थोरल्या बाजीरावाने केला होता. अटकेपार भगवा झेंडा फडकविण्याची त्यांची महत्वाकांक्ष होती. त्यामुळे समोरासमोर व मोकळ्या मैदानात युद्धाला प्रारंभ झाला होता. त्यामुळे तलवारीच्या बनावटीत बदल घडून आला. कित्येक तलवारीच्या पानाचे आकार हे सरळ पण लवचिक व समोरील बाजूला सरपट व गोलाकार स्वरूपाचे होते. तसेच करवतींच्या सारखी धावत्या नागिनीच्या आकाराप्रमाणे असलेल्या या तलवारी प्रचलित होत्या. स्थानिक कारागीर किंवा लोहार हे तलवारी बनविण्याचे काम करीत होते. याशिवाय मराठ्यांच्या तत्कालीन काळात तलवारींना विविध नावाने ओळखले जात होते. तितोडी नवाब वियाझी, संकड, निरांग, कृष्णा कंगवली, फिरंगी, दांडपट्टा इत्यादी तलवारीचे विविध प्रकार होते.

धुळ्यातील राजवाडे इतिहास संशोधन मंडळात पेशव्यांच्या काळातील तलवारी संग्रहीत आहेत. त्याचबरोबर पुणे येथील राजा दिनकर केळकर वस्तुसंगहालयात व डेक्कन कॉलेज, येरवडा जि. पुणे येथील मराठा वस्तुसंग्रहालयात मराठ्यांच्या तलवारी संग्रहित आहेत. दांडपट्टा, सकेल, धूप आणि किरच इत्यादी तलवारी मराठ्यांच्या कल्पनेतून बनल्या होत्या.

भारतात तलवारीचे पाते व मूठ यावर कलाकुसर आणि नक्षीकाम करण्यात येई. पात्यावर कुराणातील वचने, डोळे आणि कमळ इत्यादीची चित्रे कोरल्याचे दिसून येते. सध्या परंपरा राखण्यासाठी तसेच लष्करी, पोलीस व अधिकारी तलवारी वापरतात. लष्करी आणि पोलीस प्रबोधिनी शिक्षणात उच्च कमांकित स्नातकाला स्न्मान तलवारी प्रदान करण्याची परंपरा, प्रथा दृढ आहे.[5]

### *संदर्भ ग्रंथ*


1.माणिकराव रा., श्री प्रताप शस्त्रगार, सरकारी छापखाना, बडोदा, प्रथमावृत्ती, 1942, पृ. 49.
2.जोशी ल.शा., मराठी विश्वकोष, खंड 7, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई, प्रथमावृत्ती, 1977, पृ. 239.
3.मणिकराव रा., उपरोक्त, पृ. 29.
4.पंत जी. एन., भारतीय अस्त्रःशस्त्र, आर्मी एज्युकेशन स्टोअर्स, न्यू दिल्ली, प्रथमावृत्ती, 1974, पृ. 170.
5.देशपांडे प्र. न. व शहा मु. ब. (संपा.), त्रैमासिक संशोधक अंक, 52, राजवाडे संशोधन मंडळ, धुळे, प्रथमावृत्ती, 1984, पृ. 187.





***अनिल माणिकराव बैसाणे***
माजी इतिहास विभाग प्रमुख, झेड् बी. पाटील कॉलेज, देवपूर, धुळे .

